Messe Munchen India **मार्फत म्युनिक, जर्मनी येथे आयोजित** “World’s Leading Trade Fair for Environmental Technologies” **विषयावरील विदेश दौऱ्यास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक :- विदौरा-२०२६/प्र.क्र.१२९/नवि-३३**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक :- ३० एप्रिल, २०२६**

**संदर्भ:-**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. परदौ-१४२०/प्र.क्र.२६/११, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२१.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. विदौरा-१४२५/प्र.क्र.९५/विचौ-१, दिनांक २१ ऑगस्ट, २०२५.

३. Messe Munchen India, Pvt. Ltd. यांचे दिनांक ११ एप्रिल, २०२६ रोजीचे पत्र.

४. केंद्र शासनाच्या गृह मंत्रालय,परराष्ट्र विभागाच्या FCRA विंगची सदर विदेश दौऱ्यास दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजीची मान्यता.

**प्रस्तावना:-**

Messe Munchen India **मार्फत म्युनिच, जर्मनी** येथे दिनांक ०४ मे, ते ०७ मे, २०२६ या कालावधीत “World’s Leading Trade Fair for Environmental Technologies” या विषयावर अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

२. सदर दौऱ्यास संदर्भाधीन क्रमांक ३ च्या पत्रान्वये नगर विकास विभागाच्या वतीने सहभागी होण्याची विनंती केली आहे. त्यास अनुसरून अपर मुख्य सचिव, नवि-२, आयुक्त, नागपूर, ठाणे, मिरा-भाईंदर, छत्रपती संभाजीनगर, वसई-विरार महानगरपालिका व अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, बृन्हमुंबई (प्रकल्प) सदर परदेश दौऱ्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

Messe Munchen India **मार्फत म्युनिच, जर्मनी** येथे दिनांक ०४ मे, ते ०७ मे, २०२६ या कालावधीत “World’s Leading Trade Fair for Environmental Technologies” या विषयावर अभ्यास दौऱ्यास परदेश खालील नमूद भाप्रसे अधिकाऱ्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | भाप्रसे अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम |
|---|---|
| १ | श्री. के. एच. गोविंदराज, अमुस, नगर विकास विभाग( नवि-२) |
| २ | श्री सौरभ राव, आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे |
| ३ | श्री. अभिजीत बांगर अतिरिक्त आयुक्त बृन्हमुंबई महानगरपालिका |
| ४ | डॉ. विपीन इटनकर, आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर |
| ५ | श्री. अमोल येडगे आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपलिका, छत्रपती संभाजी नगर |
| ६ | श्री. पृथ्वीराज बी. पी., आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका |
| ७ | श्री.राधाबिनोद ए. शर्मा, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, मिरा भाईंदर. |

२. सदर परदेश दौऱ्याचा कालावधी हा प्रवास कालावधी धरून दिनांक ०२ मे, २०२६ ते ०९ मे, २०२६ राहील.
३. सदर विदेश दौऱ्याचा संपूर्ण खर्च हा केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत कार्यालयीन व प्रशासकीय खर्चातून (A&OE) मार्फत करण्यात येणार आहे.
४. परदेश दौऱ्यासाठी जाणाऱ्या उक्त भाप्रसे अधिकाऱ्यांच्या सदर दौऱ्याचा कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून गृहीत धरण्यात यावा.
५. सदर विदेश दौऱ्यास केंद्र शासनाच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी e-Political Clearance दिलेला आहे. शासनाच्या विहित नियमानुसार सदर दौऱ्याच्या कालावधीत त्यांना दैनंदिन भत्ता व इतर अनुषंगिक खर्च अनुज्ञेय असतील.
६. सदर परदेश दौऱ्यासाठी जाणाऱ्या अधिकाऱ्यांना सध्याच्या नियमांनुसार परकीय चलन काढण्यासाठी आणि भारत सरकारच्या आर्थिक व्यवहार विभागाच्या मान्यतेच्या अधीन राहून त्यांच्या स्वतःच्या संसाधनांनमधून वैयक्तिक खर्चासाठी मान्यता देण्यात येत आहे. अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार मंत्रालयाच्या मंजुरीच्या आधारे ते संबंधित देशातील कोणत्याही अधिकृत डीलरकडून केंद्र शासनाच्या विहित मर्यादेत परकीय चलन घेऊ शकतील.
७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov,in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६०४३०१७५४३२२९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2026.04.30 18:20:23 +05'30'

**(सचिन द. सहस्त्रबुद्धे)**
**उप सचिव, नगर विकास विभाग**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव, गृहनिर्माण व नागरी आवास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
४. सचिव, अर्थ मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली.
५. सचिव, परराष्ट्र मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
७. अतिरिक्त मुख्य सचिव (सा.प्र.वि.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (२), मंत्रालय, मुंबई.
१०. महालेखापाल-१ , महाराष्ट्र, मुंबई.
११. आयुक्त, नागपूर, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, मिरा-भाईंदर, वसई-विरार महानगरपालिका.
१२. अतिरिक्त आयुक्त बृन्हमुंबई महानगरपालिका, बृन्हमुंबई
१३. निवडनस्ती, नवि-३३.